२००

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २८ /११/२०२३

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विमंअ -२०१४/प्र.क्र.५४७/सेवा -५, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३.

**विषय** :- नागपूर येथील हिवाळी अधिवेशन कालावधीत अधिकाऱ्यांकरिता केंद्र/राज्य /स्थानिक संस्था/ अन्य उपक्रम येथील विश्रामगृहाच्या भाड्याची प्रतिपूर्ति व अधिकारी कर्मचा-यांना विशेष दैनिक भत्ता मंजूर करणेबाबत.

******

**परिपत्रक** -

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विमंअ -२०१४/प्र.क्र.५४७/सेवा -५, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३११२३१७०५२५६००५ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.).
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक,लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह).
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके /आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे / नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना /प्रशासन / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग/ सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान,नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
उप संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४.

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**नागपूर येथील हिवाळी अधिवेशन कालावधीत अधिकाऱ्यांकरिता केंद्र/राज्य /स्थानिक संस्था/ अन्य उपक्रम येथील विश्रामगृहाच्या भाड्याची प्रतिपूर्ति व अधिकारी कर्मचा-यांना विशेष दैनिक भत्ता मंजूर करणेबाबत.......**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय, क्रमांकः विमंअ -२०१४ /प्र.क्र.५४७ /सेवा- ५**
खो.क्र.३३३ (विस्तार), तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२३.

**वाचा-**

१) शासन निर्णय क्रमांक: टीआरए-२३६८/१६२१/एक-अठरा, दि. २७ ऑक्टोबर, १९७०
२) शासन निर्णय क्रमांक: टीआरए-१०७७/१५६-सी/सेवा-५, दि. ११ ऑगस्ट, १९७७
३) शासन निर्णय क्रमांक:प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दि. ३ मार्च, २०१०
४) शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०१०/प्र.क्र.३१/सेवा-५, दि. २३ डिसेंबर, २०११
५) शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०१२/प्र.क्र.३१/सेवा-५, दि.२१ डिसेंबर, २०१२
६) शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१/सेवा-५, दि. १९ जानेवारी, २०१३
७) शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०१४/प्र.क्र.५४७/सेवा-५, दि.२२ डिसेंबर, २०१४
८) शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०१४/प्र.क्र.५४७/सेवा-५, दि.०४ एप्रिल, २०१५

**प्रस्तावना -**

विधानमंडळाच्या नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनादरम्यान अधिकारी/कर्मचारी यांना देय असलेला दैनिक भत्ता अपूरा पडत असल्याबाबतची बाब निदर्शनास आली आहे. या सर्व बाबींचा विचार करुन उपरोक्त क्रमांक ८ येथील दि.०४.०४.२०१५ च्या शासन निर्णयातील दैनिक भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

या सर्व बाबींचा विचार करुन शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

नागपूर येथील हिवाळी अधिवेशन कालावधीत जे अधिकारी, कर्मचारी केंद्र/राज्य/स्थानिक संस्था/ अन्य उपक्रम यांच्या विश्रामगृहात राहतील त्यांच्या विश्रामगृहाच्या भाड्याची प्रतिपूर्ति संबंधित विभागाने त्यांच्या कार्यालयीन खर्चातून करावी. ज्या अधिकारी /कर्मचाऱ्यांनी भाड्याची रक्कम रोखीने भरली असेल तर त्याची प्रतिपुर्ति विभागाने कार्यालयीन खर्चातून करावी.

नागपूर अधिवेशनाकरिता आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना देय असलेल्या, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.५४७/सेवा-५, दि. ०४ एप्रिल, २०१५ मधील तक्त्यान्वये अनुज्ञेय दैनिक भत्त्यात पुढीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे. त्यानुसार विधी मंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या कामासाठी नागपूर येथे जाणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना शिबीर कार्यालय उघडण्यात येणाऱ्या दिनांकापासून ते कार्यालय बंद होईपर्यंतच्या कालावधीत सर्वसाधारण दैनिक भत्त्याच्या तुलनेत विशेष दैनिक भत्त्याचे दर खालीलप्रमाणे देय राहतील.

| अ.क्र. | वेतन मर्यादा (सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रिक्स) | दि.०४.०४.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार वाढीव विशेष दैनिक भत्ता | सुधारीत वाढीव विशेष दैनिक भत्ता |
|---|---|---|---|
| १. | एस-२९ व त्याहून अधिक | रु.७२५/- | रु.१४००/- |
| २. | एस-२३ ते एस-२८ | रु.६७५/- | रु.१३००/- |
| ३. | एस-२० ते एस-२२ | रु.६५०/- | रु.१२५०/- |
| ४. | एस-१५ ते एस-१९ | रु.६२५/- | रु.१२००/- |
| ५. | एस-१३ ते एस-१४ | रु.५७५/- | रु.११००/- |
| ६. | एस-१२ व त्यापेक्षा कमी | रु.५२५/- | रु.१०००/- |

नागपूर अधिवेशन कालावधीत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना राहण्याची (वास्तव्याची) व भोजनाची सोय शासनाकडून झाल्यास त्यांना दैनिक भत्ता (Daily Allowance) पुढील प्रमाणे देय होईल

| | |
|---|---|
| फक्त राहण्याची (वास्तव्याची) व्यवस्था झाली असेल तर | अनुज्ञेय दराच्या ¾ दराने |
| फक्त भोजनाची व्यवस्था झाली असेल तर | अनुज्ञेय दराच्या ½ दराने |
| जेव्हा राहण्याची (वास्तव्याची) व भोजनाची व्यवस्था झाली असेल तर | अनुज्ञेय दराच्या ¼ दराने |

या शासन निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना वित्त विभाग, शासन निर्णय दि.२७.१०.१९७० नुसार संपूर्ण दराचा दैनिक भता अनुज्ञेय ठरणार नाही.

सदर आदेश डिसेंबर २०२३ च्या अधिवेशनापासून लागू होतील व ते नागपूर अधिवेशन कालावधीसाठीच अनुज्ञेय राहतील इतर वेळी वित्त विभाग, शासन निर्णय दि.३ मार्च, २०१० मधील आदेश लागू राहतील. तसेच सदर दैनिक भत्ता देतांना अनुक्रमांक १ व २ येथील दि. २७.१०.१९७० व दि.११.०८.१९७७ च्या शासन निर्णयातील अन्य तरतूदीही विचारात घेणे आवश्यक ठरेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२३११२३१७०५२५६००५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ANITA GOPAL LAD

Digitally signed by ANITA GOPAL LAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ea301388f7ad90c42cd7371a0cf689f51af343e6aa289008e23216a8ab924b97, pseudonym=B77C9E9C928960A1D6B817CA8D38C386AAF197C5, serialNumber=90D52E423E1797301D37FD07F3466E12959376B3BFD39E811A67741F25100F5E, cn=ANITA GOPAL LAD
Date: 2023.11.23 17:05:35 +05'30'

(अनिता लाड)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

| | |
|---|---|
| राज्यपालांचे सचिव<br>मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव<br>उपमुख्यमंत्री यांचे सचिव<br>सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव<br>मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई<br>सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य<br>मंत्रालयीन सर्व विभाग<br>सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई<br>सचिव, मा.सभापती, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई<br>सचिव, मा.अध्यक्ष, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई<br>मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख<br>प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),मुंबई.<br>प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा),मुंबई.<br>सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई.<br>सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.<br>प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.<br>मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई<br>आयुक्त राज्य माहिती आयोग,(सर्व)<br>सचिव राज्य निवडणूक आयोग,मुंबई.<br>प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/ औरंगाबाद.<br>महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई<br>सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,<br>लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.<br>संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,<br>विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,<br>ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.<br>बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १<br>भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २०<br>भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४,राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,मुंबई ४<br>भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३<br>इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५<br>नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१<br>शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, |

| | |
|---|---|
| रोड, पुणे<br>सर्व विभागीय आयुक्त.<br>सर्व जिल्हाधिकारी<br>सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.<br>महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.<br>महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई<br>महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर<br>महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर<br>सिनियर रिसर्च ऑफिसर, पे-रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,<br>संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई<br>अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई<br>संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई,<br>सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर. | मुंबई २८<br>वित्त विभागातील सर्व कार्यासने<br>निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-३) |